Rotary
RID 3030
Club No. 29934

CREAT HOPE
in the WORLD

# Nation Builder Award

This certificate of
Nation Builder Award 2023
is presented to

DR. N. G. NIKAM

for valuable contribution to nation building as a teacher.

Manoj Kabra

**MANOJ KABRA**
Club President
Rotary Club of Nasik Mid Town

Asha Venugopal

**ASHA VENUGOPAL**
District Governor
RI District 3030

Rotary
RID 3030
Club No. 29934

CREAT HOPE
in the WORLD

# Nation Builder Award

This certificate of
Nation Builder Award 2023
is presented to

PROF. V. S. GAVALI

for valuable contribution to nation builting as a teacher.

Manoj Kabra

**MANOJ KABRA**
*Club President*
*Rotary Club of Nasik Mid Town*

Asha Venugopal

**ASHA VENUGOPAL**
*District Governor*
*RI District 3030*


Let's GIVE THE BEST
We Appreciate Your Excellent
Performance & Wishing
You To
Create Hope In The World
From
Rtn. Manoj Kabra
President
Rtn. Sonia Vohra
Club Secretary
2023-24
Rotary
RID 3030
Club No. 29934
CREATE HOPE in the WORLD
Rotary Club of Nashik Midtown

# Vishal Tejrao Narwade (IAS)

7666617707
poitdp.kalwan-mh@gov.in


सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

D.O.Letter No. 3423 /WS / /20

Date : 21 / 4 /2023

To,
The Principal,
Guru Gobind Singh College of Engineering and
Research Centre, Nashik

**Subject: Appreciation of the efforts taken by the institute for the extension activity – Medical Camp (Free health Checkup)**

**Dear Sir;**

**Greetings of the Day**

We take this opportunity to extend our sincere thanks for the special efforts taken by the faculty, students of institute and Institutes Rotaract Students Club for the extension activity medical camp (free health checkup). The institution in collaboration with ASHOK Medicover organized this medical camp at Chankapur Ashram School (Tal. Kalvan, District Nashik). We really impressed with the enthusiasm and the responsibility towards the society shown by faculties and students of your institute.

Looking at the masses involved in this activity we realized that indeed organizing such events supports the Government and helps to provide good medical care specially in the tribal areas. We expect that the institute will continue such extension activities and this will definitely inculcate the social responsibility among the students.

Thanks

**Vishal Narwade (IAS)**
**Assistant Collector & Project Officer**
**ITDP Kalwan.**

Prof Gawali
21/04/23

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# ६०० विद्यार्थिनींनी घेतली गर्भाशय कर्करोग प्रतिबंधक लस

## गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनमध्ये मोफत लसीकरण शिबिर





**नाशिक ।** गुरु गोबिंद सिंग फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ नाशिक, गोदावरी आणि कॅन्सर पेशंट ॲण्ड असोसिएशन अर्थात सीपीएएच्या संयुक्त विद्यमाने गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनच्या प्रांगणात मोफत गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनच्या ६०० हून अधिक विद्यार्थिनींनी मोफत लसीकरणाचा लाभ घेतला.

डॉ. नूपुर खरे म्हणाले की, जगभरातील स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग म्हणजे सर्व्हायकल कॅन्सर हा चिंतेचा विषय आहे. स्त्रियांमध्ये सामान्यत: हा कर्करोग चौथ्या क्रमांकावर आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, २०२० मध्ये केलेल्या एका सर्व्हेनुसार जगात जवळपास ६ लाख ४ हजार महिलांना हा कर्करोग झाला होता. तर जवळपास ३ लाख ४२ हजार महिलांनी यामुळे आपला जीव गमावला होता. हा कर्करोग ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही)मुळे होतो. हा एकमेव असा कर्करोग आहे ज्याचा प्रतिबंध लसीकरणाद्वारे होऊ शकतो. त्यामुळे वय ९ ते २० या वयोगटातील सर्व मुली व युवतींनी ही लस घेणे गरजेचे आहे, असे आवाहन डॉ. नूपुर खरे यांनी केले.

डॉ. संगीता लोढा म्हणाले की, योग्य काळजी घेतली तर प्रत्येक स्त्री निरोगी आयुष्य जगू शकते. भारतात याबाबत नियमित तपासणी केली जात नसल्याने सुरुवातीच्या टप्प्यात हा आजार लक्षात येत नाही. मात्र, लक्षात येतो तेव्हा तो गंभीर झालेला असतो. सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाची एचपीव्ही लस या कर्करोगाचे नक्कीच समूळ उच्चाटन करेल. यासाठी रोटरी क्लब सर्वतोपरी पुढाकार घेईल.

बलबीर सिंग छाब्रा म्हणाले की, शैक्षणिक संस्था म्हणून जरी गुरुगोबिंद सिंग फाऊडेशन कार्यरत असली तरी सामाजिक बांधिलकी जपण्यासाठीही संस्था अग्रेसर आहे. रोट्रॅक्ट क्लबच्या माध्यमातून विद्यार्थी नेहमीच सामाजिक कार्यात सहभागी होतात. भविष्यातही गुरु गोबिंद सिंग फाउंडेशन शिक्षणासोबतच जनसामान्यांच्या निरोगी आरोग्यासाठी १०० टक्के योगदान देईल.

याप्रसंगी नाशिक महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचे संचालक डॉ. आवेश पलोद, रोटरी क्लब ऑफ नाशिक गोदावरीच्या अध्यक्षा डॉ. संगीता लोढा, सचिव सुरेश चावला, गुरु गोबिंद सिंग फाऊंडेशनचे अध्यक्ष बलबीरसिंग छाब्रा, सचिव कुलजीत सिंग बिर्दी, सहसचिव कुलतरण सिंग सचदेवा, शरनदेव सिंग गिल, सीपीएएच्या संचालिका डॉ. नूपुर खरे, असिस्टंट डायरेक्टर डॉ. प्रिया प्रसाद, लॅब ऑफिसर नाझिया खान, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. श्रीहरी उपासनी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम उपस्थित होते. गुरुगोबिंद सिंग पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य मनीष नंदवाणी यांनी सूत्रसंचालन केले.

दिव्य मराठी
नाशिक सिटी 11-04-2023

दिव्य मराठी विशेष • गुरू गोबिंदसिंग फाउंडेशनच्या कार्यक्रमात डॉ. किरण पाटील यांचा संवाद

# स्त्रियांनी कर्करोगबाबत विशेष दक्षता घ्यायला हवी

प्रतिनिधी ।नाशिक

केवळ कर्करोग नाव ऐकूनच घाबरणारे लोक खूप आहेत, परंतु कर्करोगाची लक्षणे समजावून घेतली आणि वेळीच इलाज केला तर कर्करोग नक्की बरा होऊ शकतो. विशेष करून स्त्रियांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत असून तो कशामुळे होतो, होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी याचा अभ्यास स्त्रीयांनी करावा अन् त्यातून आपली अन् आपल्या कुटुंबाची कर्करोगापासून सुरक्षा करावी, असे मार्गदर्शन कर्करोगतज्ज्ञ डॉ. किरण पाटील यांनी केले.



डॉ.किरण पाटील यांचा सत्कार करताना गुरू गोबिंद सिंह फाउंडेशनचे प्रमुख पदाधिकारी

नाशिक पंजाबी वेलफेअर असोसिएशन आणि गुरू गोबिंद सिंग फाउंडेशनच्या वतीने आयोजित कर्करोग जागरूकता शिबिरामध्ये ते बोलत होते. इंदिरानगर येथील गुरू गोबिंद सिंग संस्थेमध्ये कर्करोग जागरुकतेबाबत विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. किरण पाटील मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, स्त्रीयांनी कडधान्य खराब होण्याच्या भितीने फ्रीजमध्ये साठवू नये.

कर्करोग हा काहीही न सांगता सुदृढ व्यक्तिलादेखील होऊ शकतो. कर्करोगात कॅन्सरोत्तेजके आपल्या शरीरातील चांगल्या पेशींवर आघात करतात आणि या पेशींची वाढ अनियंत्रित पद्धतीने होते व त्यांच्यापासून गाठी तयार होतात् यासाठीच न दुखणारी गाठ, तोंडात येणारे लाल/सफेद डाग, १४ दिवसांपेक्षा जास्त दिवस राहणारा कफ, बद्धकोष्ठतेचा त्रास, रंग व आकार बदलणारा तीळ याकडे दुर्लक्ष न करता योग्य वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे. कारण ही कर्करोगाची प्राथमिक लक्षणे असू शकतात. कर्करोगाचे लवकर निदान झाले तर कर्करोग नक्कीच बरा होतो. दररोज आहारात भरपूर हिरव्या पालेभाज्या व फळे यांचे सेवन केले पाहिजे. केमोथेरपीद्वारे केवळ पीडित पेशींवर इलाज करून, योग्य समुपदेशन करून कर्करोग निश्चित बरा होतो. आता केवळ डॉक्टरच नाही तर कर्करोगावर मात करून आनंदी आयुष्य जगणारे नामांकित व्यक्तिही याबबात जनजागृती करत असल्याचे डॉ. पाटील म्हणाले. फाउंडेशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष स. हरजितसिंग आनंद, वरिष्ठ सहसचिव बलजितसिंग सिबल तसेच व्यवस्थापन मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. फाउंडेशनच्या सर्व शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, शिक्षक तसेच कर्मचाऱ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. सहायक प्राध्यापक विद्यासागर गवळी आणि सतबीरसिंग हुंदल यांनी विशेष योगदान दिले.

# गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकीय मध्ये " मेरी माटी, मेरा देश " उपक्रम वचनबद्धतेची पंचप्रण प्रतिज्ञा

**नाशिक** | गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकीय महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव निमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहिदांच्या स्मृतीला उजाळा देऊन वीरांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ' मेरी माटी, मेरा देश ' हा उपक्रम दि ०९ ऑगस्ट रोजी राबविण्यात आला. देशासाठी बलिदान दिलेल्या शूर स्वतंत्र सैनिकांचा सन्मान करणे हा या मोहिमेचा मुख उद्देश आहे. महाविद्यालयीन प्रांगणात सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम उप प्राचार्य डॉ.शयामकुमार काळपांडे तसेच सर्व विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पंचप्रण प्रतिज्ञा केली. व शपत घेतली.

या उपक्रमकृतीतून आपल्या देशाची समृद्ध परंपरेचा वारशाचा अभिमान बाळगणे एकता व बंधुता टिकून ठेवणे नागरिकांनी आपली कर्तव्ये पार पाडणे आणि देशाचे रक्षण करणाऱ्याप्रति आदर भाव राखणे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. निकम यांनी व्यक्त केले. गुरु गोबिंद सिंग संस्थेचे पदाधीकारी यांनी देखील देशासाठी बलिदान दिलेल्या शूरवीरांना आदरांजली अर्पण केली. उपक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक पाटील, सहकारी श्री,योगेश चुंभळे व क्रीडा प्रमुख प्रा. चेतन जोशी यांनी कार्य केले.

# गुरू गोबिंदसिंगमध्ये महिला उद्योजकतेचे धडे



इंदिराननगर । गुरु गोबिंद सिंग कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या महिला तक्रार निवारण समितीतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर नाशिकच्या चेअरमन नेहा खरे यांचे महिला उद्योजक या विषयावर व्याख्यान झाले. आशावाद खूप महत्वाचा असतो. प्रत्येकात एक उद्योजक दडलेला असतो. महिला उद्योजक संयमाचेही धडे देतात, असे नेहा खरे यांनी सांगितले. महिला व शिक्षकांसाठी विविध प्रकारचे खेळ, स्पर्धा झाल्या. प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम, उपप्राचार्य डॉ.श्यामकुमार काळपांडे, रजिस्टार मनोज कोळी यांनी मनोगत व्यक्त केले.

दिव्य मराठी
नाशिक सिटी 26-03-2023

# गुरु गोबिंदसिंग फाउंडेशनच्या आरोग्य शिबिरात ५४२ विद्यार्थ्यांची तपासणी

**नाशिक :** गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनच्या वतीने (जीजीएसएफ) लोकार्पण करण्यात आलेली अत्याधुनिक सोईंनी सज्ज मोबाइल मेडिकल व्हॅन गरजूंसाठी ग्रामीण भागात कार्यरत करण्यात आली आहे. या अंतर्गत गुरु गोबिंद सिंग फाउंडेशन संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्र तसेच अशोका मेडीकव्हरच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आरोग्य तपासणी शिबिरात तब्बल २२४ विद्यार्थिनी, ३१८ विद्यार्थी असे ५४२ विद्यार्थी तसेच ३२ शिक्षक कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली.



चणकापुर येथील शासकीय आश्रम शाळेत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात आरोग्य तपासणी, दंत तपासणी, नेत्र तपासणी करण्यात आली तसेच आश्रम शाळेच्या विद्यार्थिनींना आरोग्याची विशेष काळजी यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला कळवणचे प्रकल्प अधिकारी श्री. विशाल नरवडे, आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. भुजबळ तसेच आश्रम शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचारी यांचे या शिबीर आयोजनासाठी मोलाचे सहकार्य लाभले. गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनतर्फे विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅड तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत औषध गोळ्यांचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम आणि सहा. प्राध्यापक विद्यासागर गवळी, सहा. प्राध्यापिका वृंदा भालेराव, प्रज्ञा बच्छाव यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी करिअर कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. यशस्वी होणारा विद्यार्थी नक्कीच त्याचे यशस्वी भविष्य घडवेल, असे सांगितले. मुख्य प्रशासक नितिन टावरी, कुलसचिव मनोज कोळी, सहा. प्राध्यापक प्रवीण शिंदे, तन्मय भार्वे, सहायक हेमंत जाधव, संदीप थापेकर तसेच. विनोद मासुळे, बबन नागरे, संतोष वारूंगसे, अनुज शेख यांसह सर्व कर्मचाऱ्यांनी या यशस्वीतेसाठी योगदान दिले.

दिव्य मराठी नाशिक सिटी 25-05-2023

# गुरु गोबिंदसिंग फाउंडेशनतर्फे छबिल सप्ताह; प्रार्थना मंदिरात विशेष अरदास



इंदिरानगर । पाचवे शीख गुरू, शहीद गुरू अर्जन देवजी यांच्या स्मरणार्थ शीख बांधव छबिलचे आयोजन करतात. यानिमित्त गुरु गोबिंदसिंग फाउंडेशन या शैक्षणिक संस्थेद्वारा छबिल सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहानिमित्त मधुर, थंडगार सरबताचे मोफत वाटप वडाळा, पाथर्डी भागामध्ये करण्यात आले. प्रार्थना मंदिरात विशेष अरदास अर्पण करण्यात आली. छबिलची परंपरा गुरू अर्जन देव जी यांच्या हौतात्म्याशी निगडीत आहे. त्यांच्या निःस्वार्थ सेवेचे स्मरण राहावे, सर्वांमध्ये बंधुभाव आणि समानता रहावी म्हणून शीख बांधव आजही छबिलची परंपरा जोपासत आहेत. त्यांच्या याच शिकवणीचा प्रत्यय शहरातील सर्व नागरिकांनी छबिलद्वारा घेतला. गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनतर्फे संस्थेच्या प्रवेशद्वाराशी मंडप लावून थंडगार सरबताचे वाटप करण्यात आले. सचिव कुलजितसिंग बिर्दी, सहसचिव बलजितसिंग सिबल, सदस्य भुजबलबीरसिंग सहानी, शरणदेवसिंग गिल तसेच व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. संस्थेतील कर्मचाऱ्यांनी देखील सेवाभाव जपत छबिल आयोजनात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# ९ ते २० या वयातच ह्यूमन पॅपिलोमा व्हायरसचा संसर्ग

अधिकाऱ्यांकडून युवतींशी या कर्करोगाचे धोके, लक्षणे आणि उपायांबाबत संवाद साधण्यात आला. शहरात गुरू गोबिंदसिंग फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ नाशिक गोदावरी आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशन (सीपीएए)च्या संयुक्त विद्यमाने ९ ते २० वयोगटातील मुलींमध्ये या कर्करोगाबाबत जागृती करण्यात येऊन लसही देण्यात आली. पालिका घनकचरा व्यवस्थापनाचे संचालक डॉ. आवेश पलोड, डॉ. संगीता लोढा, बलबीरसिंग छाब्रा, कुलजितसिंग बिर्दी, कुलतरणसिंग सचदेवा, शरणदेवसिंग गिल, डॉ. प्रिया प्रसाद, नाझिया खान, श्रीहरी उपासनी, डॉ. नीलकंठ निकम यांच्या उपस्थितीत झालेल्या या आरोग्य उपक्रमात 'सीपीएए'कडून युवतींना या गंभीर आजारापासून बचाव होणे शक्य असल्याचे डॉ. खरे यांनी सांगितले. हा उपक्रम नाशिक शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांसह वसतिगृहांमध्येदेखील राबविला जाणार असून, त्याद्वारे या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही यावेळी मान्यवरांकडून सांगण्यात आले. मनीष नंदवाणी यांनी सूत्रसंचालन केले.

दिव्य मराठी
नाशिक सिटी 04-10-2023

# 'गुरु गोबिंदसिंग'च्या विद्यार्थ्यांनी केली हृदयरोग जनजगृती

**नाशिक** | २९ सप्टेंबर रोजी जागतिक हृदयरोग दिनाचे औचित्य साधून गुरू गोबिंदसिंग कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सेंटर कॉलेज मेडिकल कमिटी आणि सह्याद्री हॉस्पिटल यांच्या वतीने विद्यमाने हृदयविकाराबाबत जनजागृती करण्यात आली. यात 'हृदयाने हृदयाचा ओळखू या अंदाज' हे पथनाट्य सादर करण्यात आले. नाशिक शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी तसेच कार्यालयांमध्ये महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी २५ ते २७ सप्टेंबर या तीन दिवसांत जनजागृती केली. यात सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, पंचायत समिती, ठक्कर बाजार बसस्थानक, नाशिक महापालिका मुख्यालय, महामार्ग बसस्थानक अशा विविध ठिकाणी पथनाट्यातून जनजागृती करण्यात अली संबंधित कार्यालय अधिकारी आणि कर्मचारी उपक्रमाला उपस्थिती दर्शवून स्तुती केली.

या उपक्रमात कॉलेजचे रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी रोहित इंगळे आणि २२ विद्यार्थ्यांचा सहभाग होते.या उपक्रमाचे विशेष कौतुक संस्थेचे चेअरमन सरदार बल्बीरसिंग छाब्रा, सेक्रेटरी सरदार कुलजितसिंग बिर्दी, सरदार हरजीतसिंग आनंद यांनी केले. प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम यांनी मार्गदर्शन केले. तसेच सह्याद्री हॉस्पिटलचे चेतन जोशी, आशिष गायकवाड तसेच अन्य सहकारी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे संयोजक महाविद्यालय रजिस्टार मनोज कोळी, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक पाटील, योगेश चुंभळे, प्रा. वृंदा भालेराव यांनी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला.

दिव्य मराठी नाशिक सिटी 10-04-2022

# गुरूगोबिंद सिंग अभियांत्रिकी विद्यालयात रक्तदान शिबिर




**इंदिरानगर** | गुरूगोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयात रक्तदान व नेत्रतपासणी शिबिर जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून गुरूगोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय व संशोधन केंद्रात झाले. रक्तदान व नेत्रतपासणी शिबिरात गुरूगोबिंद सिंग फाउंडेशनचे मोबाइल मेडिकल क्लिनिक, रोटरॅक्ट क्लब आणि इंडियन प्लंबिंग असोसिएशनच्या विद्यार्थी मंच यांनी सहभाग घेतला. उद्घाटन फाउंडेशनचे कार्यकारी संचालक डॉ. परमिंदर सिंग यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम, संदर्भ सेवाच्या रक्तपेढीचे डॉ. पुरी, डॉ. अर्पित शहा, हेमंत इसे उपस्थित होते. ७५ रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या.

# इंदिरानगरला गुरू गोबिंद सिंग वायुसेनेची कार्यशाळा





**इंदिरानगर : वार्ताहर**

गुरू गोबिंद सिंग फाउंडेशन संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतीय वायुसेनेद्वारे विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय वायुसेनेमध्ये काम करण्याच्या विविध संधींबद्दल तसेच या सेवेमध्ये दाखल होण्यासाठीची संपूर्ण निवड प्रक्रियेची सखोल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विंग कमांडर अंशुमन समाजपती, विंग कमांडर दिपिन चक्रवर्ती आणि फ्लाइंग ऑफिसर सिमरन वालिया यांच्या नेतृत्वाखालील २० जवानांच्या तुकडीने गुरु गोबिंद सिंग फाउंडेशनच्या कॅम्पसमध्ये लढाऊ विमान कसे कार्यरत असते याचे संगणकीकृत प्रात्यक्षिक दिले. जेट फायटर सिम्युलेटर आणि जी सूट संबंधित हार्डवेअरची माहिती देण्यासाठी खास डिझाइन केलेल्या व्होल्वो कोचमध्ये फ्लाइंग ऑफिसर सिमरन वालिया यांनी विद्यार्थ्यांचे शंका निरसन केले.

लढाऊ विमानांच्या प्रतिकृती, इतिहास तसेच वैमानिक कसे स्वतः ला सजग ठेवतो, त्याचा पोशाख कसा असतो तसेच आपली देशाची वायु सेना घुसखोरांविरुद्ध सजगतेने कशी कार्यरत अशा सर्व बाबींची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. विंग कमांडर अंशुमन समाजपती यांनी द्वितीय विश्वयुद्धापासून सुरू झालेल्या भारतीय वायुसेनेने १९६२, १९६५, १९७१ आणि १९९९ च्या युद्धांमधील त्यांच्या जबाबदाऱ्या आणि गौरवशाली भूतकाळ स्पष्ट करणारे संवादात्मक सादरीकरण केले. विंग कमांडर दिपिन चक्रवर्ती, ज्यांनी लेह आणि सियाचीन सेक्टरमध्ये उड्डाण केले होते, त्यांनी विद्यार्थ्यांना भारतीय वायु सेनेबद्दल छोटीसी प्रश्नमंजुषा प्रस्तुत केली आणि अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचे विशेष अभिनंदन केले.

भारतीय वायुसेनेच्या या चमूचे स्वागत गुरु गोबिंद सिंग फाऊंडेशनचे अध्यक्ष बलबीर सिंग छाब्रा, वरिष्ठ उपाध्यक्ष हरजीत सिंग आनंद आणि सचिव कुलजित सिंग बिर्दी यांनी केले आणि नभं स्पर्शम दीप्तम या अर्थात गौरवाने आकाशाला गवसणी घालणारे आपले वायु दल युवा पिढी साठी निश्चितच आदर्शवत आहे असे मनोगत अध्यक्ष बलबीर सिंग छाब्रा यांनी व्यक्त केले. या संपूर्ण एकदिवसीय कार्यशाळेचे समन्वय ट्रेनिंग अँड प्लसमेंट ऑफिसर मधुकर डुबे व कुलसचिव मनोज कोळी यांनी केले. त्यांना अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम, तंत्रनिकेतन प्राचार्य प्रा. श्रीहरी उपासनी तसेच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती ज्योथि सामंता यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# गुरुगोविंद सिंग फाउंडेशनतर्फे मोफत आरोग्य तपासणी



**इंदिरानगर : वार्ताहर**

गुरुगोविंद सिंग फाउंडेशन व अपोलो हॉस्पिटल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने रयत शिक्षण संस्थेच्या आडोशी येथील राजश्री शाहू महाराज आश्रमशाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास परिसरातील विद्यार्थी, पालक व नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. गुरुगोविंद सिंग फाउंडेशनच्या विश्वस्त मंडळाच्या सीएसआर अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

आदिवासी पाड्यांमध्ये बऱ्याचदा आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध नसते, याचा विचार करून सदर मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सरदार बलबीर सिंग छाब्रा, सचिव सरदार कुलजित सिंग बिर्दी, सभासद सरदार बलजित सिंग सिब्बल, सरदार हरमिंदर सिंग सिब्बल, सरदार रघुबीर सिंग सलुजा, डॉ. अमरजित सिंग गुजराल, तंत्रनिकेतनचे प्राचार्य श्रीहरी उपासनी, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. नीळकंठ निकम, अपोलो रुग्णालयाचे तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

६०० च्यावर विद्यार्थी व पालकांनी या शिबिराचा लाभ घेतला. आरोग्य तपासणीनंतर नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला व औषधे मोफत पुरविण्यात आली. याप्रसंगी गुरुगोविंद सिंग फाउंडेशनतर्फे उपस्थितांना स्वेटर व फराळाचे वाटप करण्यात आले.

आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सुभाष कापडणीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करत शिबिराचे आयोजक गुरुगोविंद सिंग फाउंडेशनचे गुरुगोविंद सिंग तंत्रनिकेतन व अपोलो हॉस्पिटल नाशिक या दोघांचेही आभार मानले.

नवराष्ट्र

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# इंदिरानगरला गुरू गोबिंदसिंग महाविद्यालयात लसीकरण



**इंदिरानगर,** (वा.) राज्य शासनाच्या आदेशानंतर गुरू गोबिंदसिंग महाविद्यालयात विद्यार्थ्यांची रेलचेल वाढली आहे. मात्र अनेक विद्यार्थी अजूनही लसीकरणापासून वंचित राहिल्याने 'मिशन युवा स्वास्थ्य'अंतर्गत महाविद्यालयातर्फे लसीकरण मोहिम राबविण्यात आली.

## दोन डोस घेतलेल्यांना प्रवेश

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर हळूहळू निर्बंध शिथिल केले जात आहे. महाविद्यालये देखील पुन्हा सुरू करण्यात आले. राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी जाहीर केलेल्या निर्देशानुसार शहरातील गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्र विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले. कोव्हिड-१९ लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश देण्यात येत आहे. अद्यापही काही विद्यार्थी लसीकरणाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या डोसपासून वंचित आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारने मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेच्या अंतर्गत महाविद्यालयीन स्तरावर विशेष लसीकरण शिबीर आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.

## विशेष शिबिर

गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्रात नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे डॉ. ए. आर. गायकवाड आणि त्यांच्या टिमच्या सहयोगाने 'मिशन युवा स्वास्थ्य' विशेष लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन गुरु गोबिंद सिंग संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. परमिंदर सिंग, खजिनदार सुरिंदर सिंग कोचर यांच्या हस्ते करण्यात आले.

## सुरक्षिततेची काळजी

महाविद्यालयात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची सुरक्षिततेची काळजी घेण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे असे प्रतिपादन डॉ. परमिंदर सिंग यांनी यावेळी केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नीलकंठ निकम, उपप्राचार्य डॉ. श्यामकुमार काळपांडे, कुलसचिव मनोज कोळी, विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते. या मोहिमेला विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# जिल्हा क्रिकेट संघाची ७ रोजी निवड चाचणी

**नाशिक,** (वा.) महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने होणाऱ्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेतर्फे खुल्या गटातील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी रविवारी (दि. ७) हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लब येथे होणार आहे. या चाचणीसाठी इच्छुक खेळाडूंनी जिल्हा क्रिकेट संघटनेच्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथील कार्यालयात सकाळी ८.३० ते १०.३० व संध्याकाळी ४ ते ६.३० पर्यंत ६ नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या खेळाडूंनी क्रिकेट पोशाखात स्वतःच्या क्रिकेट साहित्यासह ७ नोव्हेंबर रोजी कान्हेरे मैदानावर सकाळी साडेनऊ वाजता हजर रहावे.

Nashik Plus Edition
02 November 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com